**<u>मार्गदर्शक सूचना</u>**

जा.क्र./उसंपिसं/PDMIS पत्रव्यवहार/प्र.क्र.1/492 /2013
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 5
दिनांक : 04/05/2013

**प्रति,**

विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व

**विषय:- सन 2013-14 मध्ये ऑनलाईन पी डी एम आय एस संगणक प्रणालीमध्ये कीड रोग अहवाल भरणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये आपणांस सूचित करणेत येते की, सन 2013-14 मध्ये राज्यातील खरीप व रब्बी पिकांवर पडणाऱ्या विविध किड रोगांच्या बाबतची माहिती प्रती वर्षाप्रमाणे या वर्षीही आयुक्तालयास पाठवावयाची आहे. सदर माहिती दोन स्वतंत्र अहवालात द्यावयाची आहे.

**ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे (पी डी एम आय एस) भरावयाचा अहवाल :-**

सन 2007-08 पासून केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे कीड रोगाची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये पेस्ट डिसीज मॉनिटरिंग इन्फॉरमेशन सिस्टीम (पीडीएमआयएस) द्वारे भरण्यात येत आहे. सदर प्रणाली **http://pdmis.dacnet.nic.in** या संकेतस्थळावर ऑन लाईन उपलब्ध आहे. सन 2013-14 चे अहवाल भरणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

1. प्रथम **http://pdmis.dacnet.nic.in** या संकेत स्थळावर जावे.
2. संकेत स्थळ उघडल्यावर ज्या आठवडयाचा अहवाल भरावयाचा आहे ती तारीख सिलेक्ट करावी.
3. State - महाराष्ट्र सिलेक्ट करावा. त्यानंतर संगणक प्रणाली उघडणेसाठी पासवर्ड वापरावा. **सदर पासवर्ड कोणत्याही परिस्थितीमध्ये शेअर करु नये व बदलण्यात येवू नये. पासवर्ड साठी जबाबदार अधिकाऱ्याने या कार्यालयाशी संपर्क साधावा.**
4. त्यानंतर दाखविलेला कोड नंबर बॉक्समध्ये टाईप करुन लॉगइन करावे. किडरोग बाबत माहिती भरणेसाठी विंडो ओपन होईल. सदर प्रपत्रामध्ये पिकनिहाय तसेच किड/रोग निहाय माहिती भरुन ती सेव्ह करावी.
5. सदर अहवाल संगणक प्रणालीद्वारे थेट केंद्रशासनाकडे जात असल्याने बिनचूक व वस्तुनिष्ठ अहवाल भरला जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.
6. मा. प्रधान सचिव, कृषि, मा.आयुक्त कृषि तसेच कृषि संचालक यांना केंद्रशासनास व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे प्रत्येक आठवडयात कीड रोग परिस्थिती तसेच जैविक/रासायनिक कीडनाशकांच्या

उपलब्धतेबाबत आढावा द्यावा लागतो. त्यानुषंगाने सदर विषयाचे गांभिर्य विचारात घेऊन अहवाल विहित केलेल्या दिवशीच नियमितपणे ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे भरले जातील याची दक्षता घेण्यात यावी.

7. अहवालात भरण्यात येणारी किडरोगाबाबतची माहिती क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत प्राप्त होणाऱ्या किडरोगाच्या माहितीशी तपासून घ्यावी. तसेच अहवालात भरण्यात येणारे पिकांचे पेरणीक्षेत्र सांख्यिकी विभागाच्या पेरणीक्षेत्राशी जुळते आहे याची खात्री करण्यात यावी.

8. कृषि विकास अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संयुक्त स्वाक्षरीने जिल्हयाचा अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

9. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत किड/रोग अहवाल प्रत्येक शुक्रवारी संपणाऱ्या आठवडयाच्या दिनांकास ऑनलाईन संगणक प्रणालीवर नोंदवायचा आहे. याकरिता सदर संकेतस्थळावर अहवाल भरावयाचे दिनांक केंद्रशासनाने निश्चित केले असून त्यानुसार सदर दिनांकास प्रत्येक आठवडयाचे अहवाल नियमितपणे भरण्यात यावेत. जिल्हा अधिनस्त कार्यालयाकडून कीड रोगांचे अहवाल विहित मुदतीत संकलीत करणे व सदर अहवाल प्रत्येक शुक्रवारी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन भरण्याची संपुर्ण जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. त्यानुसार त्यांनी नियमितपणे कीड रोगांचे अहवाल भरले जातील याची दक्षता घ्यावी.

10. संबंधित जिल्हयांचा अहवाल विहित दिनांकास भरले जातील याचे पर्यवेक्षण विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने करावे. यासाठी त्यांनी संबंधित जिल्हयांकडे पाठपुरावा करुन प्रत्येक शुक्रवारी अहवाल भरले असल्याची खात्री करावी.

11. आपल्या जिल्हयातील किडरोगाच्या परिस्थितीबाबत जागरुक राहून आढावा घेण्यात यावा.

राज्याचा कीड रोग प्रादुर्भावाचा आढावा केंद्र शासनाद्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे दर सप्ताहास होत असल्याने खरीप व रब्बी हंगामातील अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये न चुकता सादर केले जातील याची प्रत्येक स्तरावर दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरीत/-

**संचालक**

**विस्तार व प्रशिक्षण**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-5**

**प्रत,**

1. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी
2. कृषि विकास अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी
3. उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी